अ) **राज्यस्तरीय दक्षता पथक (प्रमुख कार्यालय)**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | उपसंचालक | : | पथक प्रमुख |
| २. | वरिष्ठ भूवैज्ञानिक / भूवैज्ञानिक | : | सदस्य |
| ३. | खाण निरीक्षक / वरिष्ठ लिपीक | : | सहायक |
| ४. | भौगोलिक माहिती प्रणाली सहायक (सर्वेक्षक) | : | सहायक |
| ५. | चतुर्थ श्रेणी कर्मचारी | : | सहायक |

ब) **प्रादेशिक कार्यालयांतर्गत दक्षता पथक**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | वरिष्ठ उपसंचालक / उपसंचालक / वरिष्ठ भूवैज्ञानिक | : | पथक प्रमुख |
| २. | भूवैज्ञानिक / कनिष्ठ भूवैज्ञानिक | : | सदस्य |
| ३. | खाण निरिक्षक / वरिष्ठ लिपीक | : | सहायक |
| ४. | भौगोलिक माहिती प्रणाली सहायक (सर्वेक्षक) | : | सहायक |
| ५. | चतुर्थ श्रेणी कर्मचारी | : | सहायक |

क) **जिल्हास्तरीय दक्षता पथक**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जिल्हा खनिकर्म अधिकारी | : | पथक प्रमुख |
| २. | उपविभागीय अधिकारी / तहसिलदार यांचे प्रतिनिधी | : | सदस्य |
| ३. | रॉयल्टी निरीक्षक / अव्वल कारकून | : | सहायक |

**दक्षता पथकाचा काम :**

१) आपल्या कार्यक्षेत्रात खाणींचे व खनिजयुक्त क्षेत्रांची आकस्मिक तपासणी करुन अवैध प्रकरणांचा शोध घेणे व प्रचलित नियमानुसार कार्यवाही करणे.

२) अवैध खनिज वाहतुकीचा शोध घेण्याच्या दृष्टीने तपासणी करुन प्रचलित नियमानुसार कार्यवाही करणे.

३) खनिज वितरक परवाना धारकांना आकस्मिक भेटी देऊन तपासणी करणे व अवैध प्रकरणी कार्यवाही करणे.

४) केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संचालक, भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय, महाराष्ट्र शासन नागपूर यांचे मार्फत राज्यस्तरीय समितीला सादर करणे.

उपरोक्त दर्शविल्याप्रमाणे कार्यवाही करतांना आवश्यकतेनुसार महसूल विभाग, वन विभाग, पोलीस विभाग, परिवहन विभाग इत्यादी विभागांची मदत दक्षता पथकाद्वारे घेण्यात येईल.

सदर दक्षता पथके दर महिन्यातून किमान चारवेळा आकस्मिक तपासण्या करतील.

स्वा/-

(वि.शं.लपालखडे)

संचालक

भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय,

महाराष्ट्र शासन,नागपूर

प्रत :

१) मा.प्रधान सचिव (उद्योग) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२, यांना माहीती करीता सादर.

२) जिल्हाधिकारी - - - - यांना माहीती तथा उचित कार्यवाहीस्तव सादर.

३) वरिष्ठ उपसंचालक, चंद्रपूर / नागपूर यांना उचित कार्यवाहीस्तव अग्रेषीत

४) उपसंचालक, कोल्हापूर / औरंगाबाद / प्रमुख कार्यालय नागपूर यांना उचित कार्यवाहीस्तव अग्रेषित

५) जिल्हा खनिकर्म अधिकारी - - - - यांना माहीती तथा उचित कार्यवाहीस्तव अग्रेषीत.

मा.संचालकांनी मान्य केलेला प्रारुप

संचालकाकरीता

भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय,

महाराष्ट्र शासन,नागपूर

निर्गमित केले

दिनांक 30 DEC 2009

शाखा लिपिकाची सही

महाराष्ट्र शासन

**राज्यातील खनिजांचे अवैध उत्खननास प्रतिबंध करण्यासाठी समित्यांची स्थापना**

४६२
५-८.२०१०

उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग
शासन निर्णय क्र.एमएनजी-१००५/प्र.क्र.८६७/उद्योग-९
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक-२७ जुलै, २०१०.

प्रस्तावना-

राज्यातील खनिजांच्या अवैध उत्खननास प्रतिबंध करणारी यंत्रणा प्रभावी करण्यासाठी राज्य व जिल्हा स्तरावर समित्या गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

खनिजांचे अवैध उत्खननसंबंधी बाबींचा आढावा घेणे, उपाय योजना आखणे व अवैध उत्खनन प्रकरणी कार्यवाही करण्यासाठी सर्व संबधित विभागांचे सहकार्य तत्परतेने मिळण्याच्या दृष्टीने तसेच समन्वय साधण्याच्या दृष्टीने खाली नमूद केल्याप्रमाणे समित्या गठीत करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

**राज्यस्तरीय समिती**

समितीची रचना-

| | | |
|---|---|---|
| १. | मुख्य सचिव | अध्यक्ष |
| २. | प्रधान सचिव (खनिकर्म) | सदस्य |
| ३. | सचिव ( पर्यावरण ) | सदस्य |
| ४. | पोलीस महासंचालक, मुंबई | सदस्य |
| ५. | परिवहन आयुक्त मुंबई | सदस्य |
| ६. | प्रधान मुख्य वन संरक्षक महाराष्ट्र राज्य | सदस्य |
| ७. | इंडियन ब्युरो ऑफ माईन्स नागपूर /गोवा यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ८. | संचालक,भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय महाराष्ट्र | सदस्य सचिव / नियंत्रक |

राज्य स्तरीय समितीची कार्ये -

१) संचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय महाराष्ट्र यांनी गठीत केलेल्या राज्यस्तरीय / प्रादेशिक आणि जिल्हास्तरावरील दक्षता पथकांनी तसेच उपसंचालक भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय व वन अधिका-यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रात अवैध खाणकाम रोखण्यासाठी केलेल्या कार्यवाहीचा आढावा घेणे.

२) इंडियन ब्युरो ऑफ माईन्स तसेच अन्य प्राधिकरणाव्दारे निदर्शनास आलेल्या अवैध खाणकाम प्रकरणाबाबतचा आढावा घेणे, संनियंत्रण करणे व उपाययोजना आखणे.

३) संबधित विभागाकडून आपेक्षित कार्यवाहीबाबत समन्वय व सुसूत्रता आणणे.

४) अवैध खाणकामाशी संबंधित राज्य / केंद्र शासनाने संदर्भित केलेल्या प्रकरणी कार्यवाहीचा आढावा घेणे.

५) केंद्र / राज्य शासनास सादर करावयाच्या शिफारशी आणि केलेल्या कार्यवाहीच्या माहितीस मान्यता देणे.

राज्यस्तरीय समितीची बैठक प्रत्येक चौमाहीत किमान एक वेळा घेण्यात येईल.

## जिल्हास्तरीय समिती

समितीची रचना

| | | |
|---|---|---|
| १. | जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २. | जिल्हा पोलीस अधीक्षक किंवा त्यांचे प्रतिनीधी | सदस्य |
| ३. | संबंधित उपजिल्हाधिकारी | सदस्य |
| ४. | जिल्हा परिवहन अधिकारी | सदस्य |
| ५. | जिल्हा वन अधिकारी | सदस्य |
| ६. | जिल्हा खनिकर्म अधिकारी | सदस्य सचिव |

समितीची कार्ये-

१) आपल्या कार्यक्षेत्रातील निदर्शनास आलेल्या अवैध खाणकाम प्रकरणी समन्वयाने कार्यवाही करणे.
२) अवैध खाणकाम रोखण्यासाठी आवश्यक उपाययोजना करणे.
३) अवैध उत्खनन व वाहतूक याला आळा घालण्यासाठी अचानक तपासणी करणे.
४) अवैध खाणकाम प्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहीती राज्यस्तरीय समितीस सादर करणे.
५) कार्यवाही करण्यात अडचणी आल्यास त्या राज्यस्तरीय समितीच्या निदर्शनास आणणे.

राज्य स्तरीय समितीची बैठक दोन महिन्यातून किमान एकदा घेण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( व.शं.कुलकर्णी )
शासनाचे अवर सचिव

प्रत-

अपर मुख्य सचिव ( वने ) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
अपर मुख्य सचिव ( महसूल) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
अपर मुख्य सचिव ( गृह ) गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
प्रधान सचिव (उद्योग व खनिकर्म) उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग मंत्रालय, मुंबई-३२
प्रधान सचिव ( पर्यावरण ) पर्यावरण विभाग
पोलीस महासंचालक, मुंबई
परिवहन आयुक्त मुंबई
प्रधान मुख्य वन संरक्षक नागपूर
इंडियन ब्युरो ऑफ माईन्स नागपूर
संचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, नागपूर
उपसंचालक, संचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, नागपूर / चंद्रपूर / कोल्हापूर व औरंगाबाद
सर्व जिल्हाधिकारी
सर्व जिल्हा पोलीस अधीक्षक
सर्व जिल्हा खनिकर्म अधिकारी
सर्व जिल्हा परिवहन अधिकारी.

----------

प्रमुख खनिजांच्या खनिपट्टा / पूर्वेक्षण अनुज्ञप्ती अर्जांच्या अनुषंगाने प्राप्त होणा-या अहवालाच्या सुधारित प्रारुपाबाबत.

# भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय,
## महाराष्ट्र शासन,
## जुने सचिवालय इमारत, सिव्हील लाईन्स,
## नागपूर - ४४० ००१

परिपत्रक क्र. एमएलव्ही-मिस-१६३ एच/२०१०/2६२५ नागपूर दि. 16 AUG 2010

## प रि प त्र क

वाचा :- १) संचालनालयाचे परिपत्रक क्र. १६३ /जी / २००२ / ६७६९ दि. १६/१२/२००२.
२) शासनाचे व्यापार, वाणिज्य व खनिकर्म विभागाचे परिपत्रक क्र. एमएनजी १०९९/(७७८७)/ कार्या -४ दि. १८/११/१९९९.
३) संचालनालयाचे परिपत्रक क्र. १६३ जी / २००२ /९५२ दि. ११/3/२००४.

शासनाचे व्यापार वाणिज्य व खनिकर्म विभागाचे परिपत्रक क्र.एमएनजी - १०९९ / (७७८७) / कार्यासन -४ दि. १८ नोव्हेंबर १९९९ व भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय, महाराष्ट्र शासन, नागपूर यांचे परिपत्रक क्र.१६३ जी / २००२ / ९५२ दि. ११.०३.२००४ अन्वये एकुण ५ मुद्यांवरील माहितीसह खनिज सवलतीकरीताचे प्राप्त अर्ज जिल्हा खनिकर्म अधिका-यांनी संचालक, भूविज्ञान आणि खनिकर्म यांचेकडे सादर करण्यासाठी सूचना दिलेल्या आहेत.

असे असले तरी ब-याचशा प्रकरणांमध्ये क्षेत्र मंजूर झालेनंतर अशी क्षेत्रे वन विभागाचे अखत्यारीत असलेचे / आरक्षणाकरिता प्रस्तावित असलेचे आढळून येते त्यामुळे खनिपट्टे कार्यान्वित झालेनंतर अश्या क्षेत्रांवर वन विभागाकडून आक्षेप घेण्यात येतात असे निदर्शनास आले आहे. सद्यस्थितीत खनिज सवलतीअंतर्गत प्राप्त करण्यांत येणा-या ५ मुद्यांवरील माहिती अंतर्गत आवेदित क्षेत्राकरिता वन विभागांकडून अभिप्राय मागविण्यांत येत नाहीत. अशा परिस्थितीत आवेदित क्षेत्र वन विभागास हस्तांतरीत झालेले आहे किंवा वन्य प्राणी अभयारण्याच्या सिमेलगतचे क्षेत्र आहे इत्यादी बाबत खनिज सवलती मंजूरीपूर्वी माहिती प्राप्त करणे आवश्यक आहे.

सबब, खनिज सवलतीची प्रकरणे सादर करण्यापूर्वी संदर्भाधीन परिपत्रकात दर्शविलेल्या ५ मुद्द्यांवरील माहिती व्यतिरिक्त जिल्हा खनिकर्म अधिकारी यांनी उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे वन विभागाकडून अभिप्राय प्राप्त करुन त्यानुसार एकुण ६ मुद्द्यांवरील परिपूर्ण अहवालासह खनिज सवलती प्रकरणे संचालक, भूविज्ञान आणि खनिकर्म यांचेकडे सादर करावीत.

संचालकांकरिता,
भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय,
महाराष्ट्र शासन, नागपूर

(मा. संचालकांनी मान्य केलेले प्रारुप)

प्रत :- १) मा. प्रधान सचिव उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

२) विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर विभाग, नागपूर / पुणे विभाग, पुणे / कोकण विभाग, कोकण / अमरावती विभाग, अमरावती / नाशिक विभाग, नाशिक / औरंगाबाद विभाग, औरंगाबाद.

३) प्रधान मुख्य वनसंरक्षक, नागपूर.

४) जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, -------------------

५) वरिष्ठ उपसंचालक, भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय, नागपूर / चंद्रपूर.

६) उपसंचालक, भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय, कोल्हापूर / औरंगाबाद.

७) जिल्हा खनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय ----------------

८) निवड नस्ती

# महाराष्ट्र शासन

**प्रमुख खनिजासंबंधात खनिज सवलत प्रस्तावांची परिपूर्ण छाननी करण्यासाठी जिल्हास्तरावर सल्लागार समिती गठीत करण्याबाबत.**

उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
शासन निर्णय क्रमांक - एमएनजी-२०१०/ प्र.क्र. ३३५६/उद्योग-९
दिनांक- १७ सप्टेंबर, २०११

**प्रस्तावना-**

प्रमुख खनिजासंदर्भात पूर्व पहाणी, पूर्वेक्षण अनुज्ञप्ती व खाणपट्टा अशा खनिकर्म सवलती शासनाव्दारे मंजूर करण्यात येतात. त्यासाठी विविध जिल्ह्यातून प्रस्ताव शासनाला प्राप्त होत असतात. त्याच प्रमाणे परवानगी दिलेल्या खनिकर्म प्रकल्पांच्या बाबतीत जिल्ह्यामध्ये विविध प्रश्न उपस्थित होत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. शक्य असेल त्याठिकाणी स्थानिक स्तरावर अशा प्रश्नाचे निराकरण करुन शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यापूर्वी अशा प्रस्तावांची परिपूर्ण छाननी करुन त्याबाबत शासनाला सल्ला देण्यासाठी एक समिती गठीत करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय-** विविध जिल्ह्यातून प्रमुख खनिजासंदर्भात प्राप्त होणा-या खनिज सवलत प्रस्तावांची परिपूर्ण छाननी करुन शासनाला सल्ला देण्यासाठी खाली नमूद केल्याप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.

| अ.क्र. | सदस्य | पदनाम |
|---|---|---|
| १. | जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २. | संचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय यांचे प्रतिनिधी. | सदस्य |
| ३. | महाराष्ट्र प्रदुषण मंडळाचे संबंधित अधिकारी | सदस्य |
| ४. | प्रादेशिक परिवहन अधिकारी | सदस्य |
| ५. | संबंधित तहसिलदार | सदस्य |
| ६. | उप वन संरक्षक | सदस्य |
| ७. | जिल्हा खनिकर्म अधिकारी | सदस्य सचिव |

**कार्यकक्षा-** खनिज सवलतीसाठी अधिसूचनेपूर्वी व अधिसूचनेनंतर प्राप्त झालेल्या अर्जातील आवेदित क्षेत्राची

१. क्षेत्रातील मानव निर्मित वा नैसर्गिक वैशिष्टये
२. यापूर्वी त्याच क्षेत्रावर खनिज सवलत देण्यात आली आहे किंवा कसे
३. हक्कनोंद अभिलेखातील नोंदी व्यतिरिक्त वन विभागाकडून वन संवर्धन अधिनियम लागू होतो किंवा कसे याची खातरजमा

E:\N Dhanye\MNG\CR 3356_samiti.doc

४. आवेदित क्षेत्राची पर्यावरणदृष्ट्या संवेदनशीलता
५. सवलत मंजूरीबाबत स्थानिक जनतेचा कल
६. उत्खननानंतर खनिज वाहतूकीमुळे गावातील वाहतूक वर्दळ वा अपघात टाळून वाहतूक व्यवस्था करण्याची शक्यता
७. उत्खननामुळे भूगर्भातील पाणी, पिण्याचे पाणी व पाण्याची पातळी यावरील परिणाम
८. धार्मिक स्थळे, इनाम जमिनी इत्यादी

या मुद्यांच्या आधारे परिपूर्ण छाननी करुन शासनाला सल्ला देणे.

समितीचा सल्ला समाविष्ठ नसलेले खनिज सवलतीचे प्रस्ताव शासनस्तरावर विचारात घेतले जाणार नाहीत.

**समितीची बैठक -** अधिसूचनेपूर्वी वा अधिसूचनेनंतर खनिज सवलतीचे अर्ज प्राप्त झाल्यानंतर आवश्यकते नुसार तथापि, २ महिन्यातून एकदा समितीची बैठक घेण्यात येईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( व.शं.कुलकर्णी )
शासनाचे अवर सचिव

प्रत-

अपर मुख्य सचिव (वने ) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव (पर्यावरण ) पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई
सचिव (परिवहन ) गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
मा.मुख्यमंत्री यांचे सचिव
मा.राज्यमंत्री (खनिकर्म ) यांचे खाजगी सचिव
प्रधान सचिव (उद्योग व खनिकर्म ) यांचे स्वीय सहाय्यक
मुख्य वन संरक्षक , नागपूर
संचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, नागपूर
सदस्य सचिव , महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ
परिवहन आयुक्त महाराष्ट्र राज्य मुंबई
सर्व जिल्हाधिकारी

त्यांना विनंती करण्यात येते की, जिल्हास्तरावरील सर्व संबंधितांना शासन निर्णयाची प्रत उपलब्ध करुन द्यावी.

( व.शं.कुलकर्णी )
शासनाचे अवर सचिव

असा. क्र. १२

रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००१

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

शनिवार, एप्रिल २१, २००१ / वैशाख १, शके १९२३

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम**

### अनुक्रमणिका

पृष्ठे

सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९.—महाराष्ट्र राज्याकरिता खनिज विकास निधी निर्माण करणे आणि खनिज समन्वेषणासाठी त्याचे उपयोजन करणे आणि राज्यातील खनिज कार्याचा विकास करणे, यांसाठी विशेष तरतूद करण्यासाठी अधिनियम .. .. .. .. २०५-२१०

दिनांक २१ एप्रिल २००१ रोजी राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे.

प्रतिमा उमरजी,<br>
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन,<br>
विधी व न्याय विभाग.

---

### सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९.

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "महाराष्ट्र शासन राजपत्रात" दिनांक २१ एप्रिल २००१ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र राज्याकरिता खनिज विकास निधी निर्माण करणे आणि खनिज समन्वेषणासाठी त्याचे उपयोजन करणे आणि राज्यातील खनिज कार्याचा विकास करणे, यांसाठी विशेष तरतूद करण्यासाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र राज्याकरिता खनिज विकास निधी निर्माण करणे आणि खनिज समन्वेषण करणे, त्याचे उपयोजन करणे व राज्यातील खनिज कार्याचा विकास करणे, यांसाठी आणि त्याच्याशी संबंधित किंवा तदनुषंगिक बाबींसाठी विशेष तरतूद करणे इष्ट होते ;

आणि ज्याअर्थी, त्याकरिता तात्काळ कायदा करणे आवश्यक वाटले ;

आणि ज्याअर्थी, विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

आणि ज्याअर्थी, उपरोक्त प्रयोजनांकरिता कायदा करण्यासाठी त्वरित कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल महाराष्ट्राच्या राज्यपालांची खात्री पटली होती ; आणि म्हणून, दिनांक २६ फेब्रुवारी २००१ रोजी महाराष्ट्र खनिज विकास (निर्मिती व उपयोजन) निधी अध्यादेश, २००१, प्रख्यापित केला होता ; २००१ चा महा. अध्या. १

आणि ज्याअर्थी, उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या बावन्नाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ. १. (१) या अधिनियमास महाराष्ट्र खनिज विकास (निर्मिती व उपयोजन) निधी अधिनियम, २००१ असे म्हणावे.

(२) तो, दिनांक २६ फेब्रुवारी २००१ रोजी अमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

व्याख्या. २. या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(क) " सल्लागार समिती " याचा अर्थ, कलम ७ अन्वये स्थापन करण्यात आलेली सल्लागार समिती, असा आहे ;

(ख) " सक्षम प्राधिकारी " याचा अर्थ, महाराष्ट्र शासनाच्या व्यापार, वाणिज्य व खनिकर्म विभागाचा सचिव, असा आहे ;

(ग) " विभाग " याचा अर्थ, शासनाचा व्यापार, वाणिज्य व खनिकर्म विभाग, असा आहे ;

(घ) " संचालक " याचा अर्थ, संचालक, भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नागपूर, असा आहे ;

(ङ) " निधी " याचा अर्थ, या अधिनियमाच्या कलम ३ अन्वये स्थापन करण्यात आलेला महाराष्ट्र खनिज विकास निधी, असा आहे ;

(च) " शासन " याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे ;

(छ) " महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ " याचा अर्थ, महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ मर्यादित, नागपूर, असा आहे ;

(ज) " व्यवस्थापकीय संचालक " याचा अर्थ, महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळाचा व्यवस्थापकीय संचालक, असा आहे ;

(झ) " सदस्य " याचा अर्थ, या अधिनियमान्वये स्थापन केलेल्या सल्लागार समितीचा सदस्य, असा आहे ;

(ञ) " विहित " याचा अर्थ, या अधिनियमान्वये तयार करण्यात आलेल्या नियमांद्वारे विहित केलेला, असा आहे.

महाराष्ट्र खनिज विकास निधी. ३. (१) या अधिनियमाच्या प्रारंभी राज्य शासन, लगतपूर्वीच्या वित्तीय वर्षामध्ये जमा झालेल्या एकूण खनिज महसुलातून यथोचित विनियोजनांद्वारे महाराष्ट्र खनिज विकास निधी या नावाने संबोधला जाणारा निधी स्थापन करील.

(२) उक्त वर्षामध्ये वसूल करण्यात आलेल्या अशा खनिज महसुलापैकी दहा टक्के रक्कम या प्रयोजनासाठी राखून ठेवण्यात येईल आणि ती अशा निधीचा भाग असेल.

(३) राज्य शासन, त्यानंतर पूर्ण झालेल्या प्रत्येक वित्तीय वर्षासाठी, यथोचित विनियोजन

करून, विनियोजन केल्यापासून तीन महिन्यांच्या आत, त्या वित्तीय वर्षाच्या एकूण खनिज महसुलाच्या वसुलीपैकी दहा टक्के रक्कम उक्त निधीमध्ये अंशदान म्हणून देईल.

४. (१) अशा प्रकारे निर्माण करण्यात आलेला निधी विभागाकडे नेमून देण्यात येईल. निधीचे वाटप.

(२) निधी, भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय आणि महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ यांच्याकडे त्यांच्या अनुक्रमे संचालक व व्यवस्थापकीय संचालक यांच्या मार्फत वितरीत करण्यासाठी, सक्षम प्राधिकारी किंवा राज्य शासनाने याबाबत नियुक्त केलेला कोणताही इतर अधिकारी यांना, उपलब्ध करून देण्यात येईल.

५. अशा प्रकारे स्थापन करण्यात आलेला निधी सक्षम प्राधिकाऱ्याकडून मंजूर करण्यात येईल आणि तो, पुढील कारणांसाठी वापरण्यात येईल :— निधीचे उपयोजन.

(क) विशेषतः राज्यातील खनिज आधारित उद्योगांना चालना देण्यासाठी भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालयाची कर्तव्ये व कार्ये पार पाडण्यासाठी ;

(ख) खनिजांचे समुपयोजन, कामांमध्ये विविधता आणणे, खाणींमध्ये मूलभूत सुविधा उपलब्ध करणे यांसारखी विविध कर्तव्ये पार पाडण्यासाठी आणि तसेच, विशेषतः राज्यातील खनिज आधारित उद्योगांना चालना देण्यासाठी १९९९ च्या खनिज धोरणानुसार कवचयंत्रणेची (शेल एजन्सीची ) कर्तव्ये पार पाडण्यासाठी संघटना म्हणून आणि कवचयंत्रणा (शेल एजन्सी) म्हणून सुद्धा महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळाची कार्ये पार पाडण्यासाठी ;

(ग) खनिज विकासाशी संबंधित असलेल्या शासन मान्य योजनांना राज्य शासनाच्या विनिर्दिष्ट पूर्वमान्यतेने पुढील उद्दिष्टांकरिता कोणत्याही अशा योजनेचा विस्तार करण्याकरिता वित्तीय सहाय्य करण्यासाठी,—

(एक) रस्ते,पाणी, वीज यांसारख्या मूलभूत सुविधा खाणींना उपलब्ध करून देण्यासाठी किंवा परिस्थितीकीय किंवा पर्यावरणीय समतोल राखण्यासाठी ;

(दोन) खनिजावर आधारित उद्योगांच्या प्रवर्तनाशी विशेष रीत्या संबंधित असलेली कोणतीही इतर कामे आणि शासनाला योग्य वाटतील अशी खनिज विकास कामे यांसाठी.

६. (१) निधीतून तिच्या प्रकल्पासाठी, वित्तीय सहाय्य मिळविण्याची इच्छा असलेली, जिच्याकडे पूर्वपहाणी परवाना किंवा पूर्वेक्षण अनुज्ञप्ती किंवा खानपट्टा मंजुरी किंवा ज्यांचे इच्छापत्र प्राप्त झालेले आहे, अशी कोणतीही व्यक्ती, विहित रीतीने, संचालकाकडे किंवा, यथास्थिति, व्यवस्थापकीय संचालकाकडे अर्ज करील. निधीतून वित्तीय सहाय्य मिळण्यासाठी कार्यपद्धती.

(२) संचालक किंवा, यथास्थिति, व्यवस्थापकीय संचालक, अर्जाची छाननी केल्यानंतर, विहित सर्वसाधारण मार्गदर्शक तत्त्वांनुसार निधीतून द्यावयाच्या वित्तीय सहाय्यासाठी अशा व्यक्तीची किंवा कंपनीची पात्रता ठरवील.

७. (१) राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, निधीचा योग्य वापर व वाटप यांसाठी निदेश देण्याच्या प्रयोजनार्थ सल्लागार समिती स्थापन करील. सल्लागार समिती, विहित करण्यात येतील अशा इतर कर्तव्यांचे देखील पालन करील. सल्लागार समिती.

(२) सक्षम प्राधिकारी शासनाच्या वतीने निधी धारण करील आणि त्याचे प्रशासन करील आणि त्याचे उपयोजन सल्लागार समितीच्या मान्यतेच्या अधीन असेल :

परंतु, निधी ज्या प्रयोजनासाठी निर्माण करण्यात आणि नेमून देण्यात आला असेल त्याखेरीज कोणत्याही इतर प्रयोजनाकरिता तो वळविण्यात येणार नाही.

(३) सल्लागार समिती पुढील सदस्यांची मिळून बनलेली असेल :—

| | |
|---|---|
| (क) मुख्य मंत्री | पदसिद्ध अध्यक्ष ; |
| (ख) व्यापार, वाणिज्य व खनिकर्म मंत्री | पदसिद्ध सदस्य ; |
| (ग) भंडारा, चंद्रपूर, नागपूर व यवतमाळ जिल्ह्याचे पालक मंत्री | पदसिद्ध सदस्य ; |
| (घ) व्यापार, वाणिज्य व खनिकर्म राज्यमंत्री | पदसिद्ध सदस्य ; |
| (ङ) शासनाचे सचिव, व्यापार, वाणिज्य व खनिकर्म विभाग | पदसिद्ध सदस्य ; |
| (च) भंडारा, चंद्रपूर, नागपूर व यवतमाळ जिल्ह्यातील संसद सदस्य. | पदसिद्ध सदस्य ; |
| (छ) अध्यक्षांच्या शिफारशींवरून शासनाने नामनिर्देशित करावयाचे महाराष्ट्र विधानमंडळाचे चार सदस्य. | सदस्य ; |
| (ज) शासनाने नियुक्त करावयाचा खनिकर्म या क्षेत्रातील एक तज्ज्ञ. | सदस्य. |

(४) शासनाचे सचिव, व्यापार, वाणिज्य व खनिकर्म विभाग, हे सल्लागार समितीचे सदस्य-सचिव म्हणूनही काम पहातील.

(५) सल्लागार समितीची कोणतीही कृती किंवा कार्यपद्धती, ही जर अधिनियमाच्या तरतुदींनुसार असेल तर, तिच्यामध्ये पद रिक्त आहे किंवा कोणत्याही सदस्याच्या नामनिर्देशनात कोणताही दोष आहे याच केवळ कारणामुळे अशी कृती किंवा कार्यपद्धती विधिअग्राह्य असणार नाही.

(६) पोट-कलम (३) च्या खंड (छ) आणि (ज) अन्वये सदस्य म्हणून वेळोवेळी करण्यात आलेली नियुक्ती, **राजपत्रामध्ये** प्रसिद्ध करण्यात येईल.

(७) पोट-कलम (३) च्या खंड (च) अन्वये समितीच्या पदसिद्ध सदस्यांना आणि खंड (छ) आणि (ज) अन्वये नामनिर्देशित केलेल्या समितीच्या सदस्यांना, विहित करण्यात येईल अशी फी व भत्ते मिळतील.

(८) पोट-कलम (३) च्या खंड (ज) अन्वये तज्ज्ञ सदस्य म्हणून नियुक्त केलेली व्यक्ती, राज्य शासनाने **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे पदावधी अगोदरच समाप्त करील तर ते खेरीज करून एरवी, त्याच्या नियुक्तीच्या दिनांकापासून तीन वर्षांच्या कालावधीसाठी पद धारण करील :

परंतु, संसद सदस्य आणि महाराष्ट्र राज्य विधानमंडळाचे सदस्य हे संसदेचे किंवा, यथास्थिति, महाराष्ट्र राज्य विधानमंडळाचे सदस्य असण्याचे बंद झाल्यास ते सल्लागार समितीचे सदस्य असण्याचेही बंद होईल.

**नियुक्त केलेल्या व्यक्तीस पदावरून दूर करणे आणि अनर्हता.**

८. (१) कलम ७ याच्या पोट-कलम (३) च्या खंड (अ) अन्वये नियुक्त केलेला एखादा अशासकीय सदस्य,—

(क) नैतिक अध:पतनाचा अंतर्भाव असणाऱ्या अपराधाकरिता फौजदारी न्यायालयाकडून सिद्धापराध ठरविण्यात आला असेल अशा बाबतीत अशी अपराधसिद्धी रद्द करण्यात आली असेल ते वगळून, किंवा

(ख) विकल मनाचा आहे आणि सक्षम न्यायालयाने तसे घोषित केले आहे ; किंवा

(ग) अमुक्त नादार आहे ; किंवा

(घ) त्याने काम करण्याचे नाकारले आहे किंवा काम करण्यास असमर्थ ठरला आहे ; किंवा

(ङ) अन्यथा सदस्य म्हणून राहण्यास अयोग्य आहे ;

अशा बाबतीत तो सदस्य म्हणून नियुक्त केला जाण्यास किंवा सदस्य असण्याचे चालू राहण्यास अनर्ह असेल.

(२) सल्लागार समितीच्या सदस्यत्वासाठी पोट-कलम (१) अन्वये अनर्ह असेल किंवा अनर्ह झाला असेल अशा कोणत्याही सदस्याला, राज्य शासन काढून टाकू शकेल :

परंतु, कोणत्याही व्यक्तीला, आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी शासनाकडून देण्यात आली नसेल तर, तिला या कलमान्वये काढून टाकण्यात येणार नाही.

**निधीचे लेखांकन.**

९. (१) वेळोवेळी, निधीमध्ये जमा करण्यात आलेल्या, त्यातून काढण्यात आलेल्या व खर्च केलेल्या रकमांचा हिशेब, सक्षम प्राधिकाऱ्याकडून विहित केलेल्या रीतीने ठेवण्यात येईल आणि वार्षिक वित्तीय विवरणपत्रामध्ये समुचित शीर्षाखाली दर्शविण्यात येईल.

(२) सक्षम प्राधिकाऱ्याकडून वार्षिक वित्तीय विवरणपत्र तयार करण्यात आल्यानंतर, होईल तितक्या लवकर ते राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल.

**सद्भावनापूर्वक केलेल्या कार्यवाहीस संरक्षण.**

१०. या अधिनियमान्वये किंवा त्याखाली केलेल्या नियमांन्वये सद्भावनापूर्वक केलेल्या किंवा करण्याचे अभिप्रेत असलेल्या अशा कोणत्याही गोष्टीबद्दल शासन किंवा सक्षम प्राधिकारी किंवा शासनाचा किंवा भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय, महाराष्ट्र राज्य याचा किंवा महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळाचा अधिकारी किंवा कर्मचारी यांच्याविरुद्ध, कोणताही दावा, खटला किंवा कायदेशीर कार्यवाही दाखल करता येणार नाही.

**नियम करण्याचा अधिकार.**

११. (१) राज्य शासनाला, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे आणि पूर्वप्रकाशनाच्या शर्तीस अधीन राहून नियम करता येतील.

(२) या अधिनियमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनांत एकूण तीस दिवसांचा होईल इतक्या कालावधीकरिता, प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल, आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे संमत होतील किंवा तो नियम करण्यात येऊ नये म्हणून

दोन्ही सभागृहे संमत होतील आणि असा निर्णय **राजपत्रात** अधिसूचित करतील तर तो नियम अशा अधिसूचनेच्या प्रसिद्धीच्या दिनांकापासून, केवळ अशा फेरबदल केलेल्या स्वरूपात अंमलात येईल किंवा यथास्थिति, तो अंमलात येणार नाही ; तथापि, असा कोणताही फेरबदल किंवा रद्द करणे यामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टींच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

अडचणी दूर करण्याचा अधिकार. **१२.** या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, राज्य शासनास, अडचण दूर करण्याच्या प्रयोजनासाठी त्यास आवश्यक व इष्ट वाटेल अशी, या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसलेली कोणतीही गोष्ट, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे करता येईल :

परंतु असे की, या अधिनियमाच्या प्रारंभापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

सन २००१ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १ याचे निरसन व व्यावृत्ती. **१३.** (१) महाराष्ट्र खनिज विकास (निर्मिती व उपयोजन) निधी अध्यादेश, २००१ हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे. २००१ चा महा. अध्या. क्रमांक १.

(२) अशा प्रकारे निरसन झाले असले तरीही, उक्त अध्यादेशान्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा कृती (काढलेली कोणतीही अधिसूचना किंवा केलेले नामनिर्देशन, नियुक्ती अथवा नियम यांसह) या अधिनियमाच्या तत्सम तरतुदी अन्वये केलेली, काढलेली यथास्थिती केलेले असल्याचे मानण्यात येईल.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

महाराष्ट्र खनिज विकास निधीतून संबंधित जिल्हयास सुयोग्यरीतीने निधीचे वितरण होण्यासंबंधी जिल्हा स्तरावर समितीचे गठण आणि मार्गदर्शक तत्वे.

महाराष्ट्र शासन,
उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग,
परिपत्रक क्रमांक : एमडीएफ १००२/प्र.क्र.-५५/उद्योग-९
मंत्रालय, मुंबई ४००
दिनांक: २६ ऑगस्ट, २००२

परिपत्रक

प्रस्तावना

भारत सरकारच्या राष्ट्रीय खनिज धोरण १९९३ ला सुसंगत राहून राज्याच्या शासन नियुक्त समितीने राज्यात आढळणाऱ्या खनिजांचे सुयोग्यरितीने उत्खनन करुन खनिजावरील स्वामित्वधनाव्दारे ( Royalty ) राज्याच्या तिजोरीमध्ये महत्वाची भर पडण्याचे दृष्टीने तसेच खनिजावर आधारित उद्योगांना चालना देणे वत्या अनुषंगाने रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देणे याकरिता राज्य खनिज धोरण १९९९ तयार केले असून, ते शासन निर्णय, व्यापार वाणिज्य व खनिकर्म विभाग, क्रमांक एमएनजी-१०२०/ प्र.क्र.७८१३ / कार्यासन-४, दिनांक ५-२-२००० अन्वये जाहिर करण्यांत आले आहे.

२. सदर खनिज धोरणाशी सुसंगत राहून राज्य शासनाने लगत पूर्वीच्या वित्तीय वर्षामध्ये जमा झालेल्या एकूण खनिज महसूलातून यथोचित विनियोजनाव्दारे "**महाराष्ट्र खनिज विकास निधी**" ची निर्मिती केली असून, वित्तिय लगतपूर्वीच्या वर्षामध्ये जमा झालेल्या एकूण खनिज महसूलापैकी १० टक्के रक्कम खनिज विकास निधीमध्ये वळती करण्यांत आली आहे व दरवर्षी जमा होणाऱ्या एकूण खनिज महसूलाच्या १० टक्के रक्कम या निधीमध्ये वळती करावयाची आहे. हा निधी कायम स्वरुपाचा असून या निधीतील शिल्लक रक्कम कोणत्याही वित्तीय वर्षात व्यपगत होणार नाही. शासनाने महाराष्ट्र खनिज विकास (निर्मिती व उपयोजन ) निधी नियम २००१ तयार केलेला आहे. त्यामधील तरतूदींनुसार निधीचे सर्वसामान्य वाटपाबाबत निर्णय घेण्याचे अधिकार मा. मुख्यमंत्री यांचे अध्यक्षतेखाली गठीत सल्लागार समितीला आहेत. सदर सल्लागार समितीच्या दिनांक २१-१२-२००१ रोजी घेण्यांत आलेल्या बैठकीत घेतलेल्या सर्वसामान्य निर्णयानुसार खनिज विकास निधीमधील १/३ रक्कम भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, नागपूर आणि महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ, नागपूर, यांना त्यांची कार्ये पार पाडण्यासाठी व उर्वरित २/३ रक्कम ही संबंधित जिल्हयातून प्राप्त होणाऱ्या खनिज महसूलाचे प्रमाणात सदर अधिनियमातील कलम-५ (सी) नुसार त्या जिल्हयामध्ये खनिकर्मामुळे जवळपासच्या बाधित क्षेत्रामध्ये विविध पायाभूत सुविधा, जसे : रस्ते, पिण्याचे पाणी, पर्यावरण, आरोग्यसेवा व परिस्थितीकीय संतुलन इत्यादि करीता पुरविण्याबाबत निर्णय घेण्यात आला.

३. उपरोक्त निर्णयानुसार प्रत्येक जिल्हयाकरिता प्राप्त होणाऱ्या खनिज विकास निधीचे योग्य रितीने वाटप होण्यासंबंधिची आणि या निधीचे वाटप करताना कोणत्या मार्गदर्शक तत्वांचा अवलंब करण्यात यावा ही बाब शासनाचे विचाराधीन होती त्यावर पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे:-

परिपत्रक:

प्रस्तावनेत दिलेल्या माहितीच्या अनुषंगाने खनिज विकास निधीचे वाटप जिल्हावार योग्य पध्दतीने होण्याकरीता प्रत्येक जिल्हयात " **जिल्हा खनिज विकास निधी वितरण समन्वय समिती** "

गठीत करण्यात येत आहे. या समितीची रचना आणि कार्यपध्दती पुढील प्रमाणे राहील :-

| | | |
|---|---|---|
| (१) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ, नागपूर | - | अध्यक्ष |
| (२) संचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, नागपूर | - | सदस्य |
| (३) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ, नागपूर. | - | सदस्य |
| (४) जिल्हाधिकारी | - | सदस्य |
| (५) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | - | सदस्य |
| (६) कार्यकारी अभियंता ( सार्वजनिक बांधकाम विभाग ) | - | सदस्य |
| (७) कार्यकारी अभियंता ( महाराष्ट्र जीवन प्राधिकरण ) | - | सदस्य |
| (८) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रतिनिधी | - | सदस्य |
| (९) महाव्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ, नागपूर. | - | सदस्य सचिव |

वेळोवेळी आयोजित करण्यांत येणाऱ्या सदर समितीचे बैठकीपूर्वी शासनाने राज्यस्तरीय सल्लागार समितीवर नामनिर्देशित केलेल्या संबंधित जिल्हयातील सदस्यांकडून / जिल्हा खनिकर्म अधिकाऱ्याकडून समितीचे सदस्य सचिव प्रस्ताव मागवून सदर प्रस्ताव समितीसमोर निर्णयार्थ ठेवतील.

४. उपरोक्त समिती खनिज विकास निधीतून संबंधित जिल्हयाकरिता उपलब्ध करण्यांत आलेल्या निधीतून "महाराष्ट्र खनिज विकास (उपयोजन व विनियोजन ) निधी अधिनियम- २००१ " महाराष्ट्र खनिज विकास (निर्मिती व उपयोजन ) निधी नियम २००१ आणि शासनाने वेळोवेळी ठरवून दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार छाननी करुन प्राप्त झालेल्या विविध प्रस्तावांवर निधीचे वाटप करण्याबाबत निर्णय घेईल.

५. खनिज विकास निधीतून वित्तीय सहाय्य प्राप्त करण्यासाठी प्रस्तावित प्रस्तावासाठी मार्गदर्शक तत्वे खालीलप्रमाणे ठरविण्यात आलेली आहेत :-

(१) प्रस्तावाचे वर्गीकरण :-

(अ ) पायाभूत सुविधांचा विकास-

१) रस्त्यांची बांधणी व विकास
२) विज व दूरसंचरण सुविधा

३) पिण्याचे पाणी पुरवठा व्यवस्थेचा विकास व पुरवणीकरण

४) पुनर्वसन व उपनगर विकास

( ब ) पर्यावरण संतुलन कायम राखणे-

१) वनीकरण

२) पाण्याची पातळी कायम राखण्याची दक्षता

३) व्यवसायीक आरोग्य सेवेला पुरवणीकरण

४) पर्यावरणाचा समतोल व प्रदुषण नियंत्रणाचे उपाय.

५) विद्यमान आणि / किंवा बंद झालेल्या खाण क्षेत्राचे सौदर्यीकरण

क) खनिज संवर्धन व विकास -

(१) खनिज संस्करण व टाकाऊ खनिज पुनः वापरण्याकरिता संशोधन व विकास.

(२) परिणामित क्षेत्र :- ( Zone of Influence )

खाण कामाशी **कारणे व परिणाम** संबंध असलेल्या पायाभूत सुविधांचा विकास व पर्यावरण संतुलनाच्या संबंधातील बाबींमध्ये खाण पट्ट्यांच्या बाहय मर्यादेपासून जास्तीत जास्त २५ कि.मी.च्या आत असावा.

३) खनिज विकास निधीतून वित्तीय सहाय्य मिळण्याकरिता पुढील संवर्गात येणारे प्रस्ताव पात्र समजले जाणार नाहीत :-

(१) खाण क्षेत्रात पायाभूत सुविधा निर्माण करणे आणि / किंवा खाणकार्य व विकास कार्यक्रम राबविण्यासाठी सुविधा निर्माण करणे.

(२) वर उल्लेखित क्र.१ (अ), (ब) (क) प्रस्तावाचे वर्गीकरणाच्या बाहेरील प्रस्ताव आणि महाराष्ट्र खनिज विकास निधी अधिनियमातील कलम ५ आणि महाराष्ट्र खनिज विकास (निर्मिती व उपयोजन) निधी नियम २००१ मधील नियम ८ मधील तरतूदी बाहेरील प्रस्ताव.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( आ.बा. कांबळे )
शासनाचे सह सचिव,
उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग
महाराष्ट्र राज्य.

प्रति,

अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ मर्या. मुंबई.

२४

खनिज विकास निधीतून मंजूर
करण्यात आलेल्या अनुदानाच्या
वितरणाबाबत कार्यपध्दती

महाराष्ट्र शासन
शासन निर्णय क्र.एमडीएफ-१०१०/प्र.क्र.९५५/उद्योग-९
उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग
मंत्रालय, मुंबई-३२
दि.२२/०४/२०१०

प्रस्तावना:-

राज्य खनिज धोरण १९९९ मध्ये निश्चित केल्यानुसार खनिज विकास निधी (निर्मिती व उपयोजन) अधिनियम २००१ अन्वये महाराष्ट्र राज्य खनिज विकास निधीची निर्मिती करण्यात आली. या निधीतून शासनाव्दारे मंजूर करण्यात आलेल्या अनुदानाचे वितरण प्रशासकीय विभागाव्दारे करण्यात आल्यानंतर प्रत्यक्ष कार्यान्वियन यंत्रणांना अनुदान वितरणाची जबाबदारी महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ नागपूर यांचेकडे सोपविण्यात आली आहे. तथापि उपरोक्त महामंडळाच्या कार्याचा गेल्या काही वर्षात विविधांगी विस्तार झाल्याने व महामंडळास त्याचे प्रमुख उद्दीष्ट खनिजाचा विकास करण्यावर लक्ष केंद्रीत करण्याची आवश्यकता लक्षांत घेऊन खनिज विकास निधीतून द्यावयाच्या विकास कामांसाठी अनुदानाचे वितरण करण्यासंदर्भात अवलंबविण्यात येत असलेल्या कार्यपध्दतीत बदल करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. यासंदर्भात शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय-

१) प्रशासकीय विभागाने अर्थसंकल्पीय कार्यपध्दतीचा अवलंब करुन वितरित केलेले अनुदान विहीत पध्दतीने आहरित करण्यासाठी संचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, नागपूर हे नियंत्रक अधिकारी आहेत.

२) खनिज विकास निधीतून आहरित केलेला निधी पूर्वीप्रमाणेच व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ यांच्या अभिरक्षेत ठेवण्यात येईल.

३) कार्यान्वियन यंत्रणांनी आवश्यक निधीची मागणी संचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालयाकडे नोंदवावी.

शेयाल्य-७३५(३००-४-२०१०)-१ क्र.शा.म.

E:\Nilesh dhaingje\MDF 1010 CR-928.doc

४) संचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, नागपूर यांनी कामांच्या प्रगतीचा आढावा घेऊन निधी वितरणाबाबत आवश्यक आदेश निर्गमित करावेत.

५) संचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालयाने निर्गमित केलेल्या निधी वितरण आदेशास अनुसरुन व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ नागपूर यांनी कार्यान्वयन यंत्रणेच्या नांवे धनादेश काढावा.

६) महामंडळाकडून धनादेश काढण्यात आल्यानंतर तो संचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालयामार्फत कार्यान्वयन यंत्रणेस वितरित करण्यात यावा.

७) या निधीतून हाती घेण्यात आलेल्या कामांच्या प्रगतीचे संनियंत्रण करण्याची जबाबदारी भूविज्ञान व खनिकर्म संचालनालयाची राहील.

८) निधीचा वार्षिक हिशोब विद्यमान पध्दती प्रमाणे ठेवण्यात यावा व महामंडळामार्फतच विधीमंडळास सादर करण्यात यावा.

ही सुधारित कार्यपध्दती शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(किशोर कदम)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

मा.मुख्यमंत्र्यांचे उपसचिव, मंत्रालय, मुंबई ३२,
मा.राज्यमंत्री (खनिकर्म) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ३२.
अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ, नागपूर.
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ, नागपूर,
संचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, नागपूर.
सर्व जिल्हाधिकारी,
सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई.
वरिष्ठ उपसंचालक, प्रादेशिक कार्यालय, भूविज्ञान व खनिकर्म
(नागपूर / चंद्रपूर )
उपसंचालक, प्रादेशिक कार्यालय, भूविज्ञान व खनिकर्म
( कोल्हापूर/ औरंगाबाद )
सर्व जिल्हा खनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
निवडनस्ती

राच=८३५-९२१

-x-

E:\Nilesh dhanjo\MDF 1010 CR-928.doc

भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय,
महाराष्ट्र शासन, नागपूर.
" परिपत्रक "

क्र. ख.वि.नि-१७ / संकीर्ण / २०१० / २५६३ नागपूर, दिनांक 9 AUG 2010

संदर्भ :- उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र. एमएफडी-१०१०/प्र.क्र.१५५/ उद्योग-९, दिनांक २२/०४/२०१०

संदर्भांकित शासन निर्णयान्वये शासनाने खनिज विकास निधीतून करावयाच्या विकास कामांसाठी अनुदानाचे वितरण करण्यासंबंधात अवलंबविण्यात येत असलेल्या कार्यपध्दतीत बदल केलेला आहे. सदर शासन निर्णयाअन्वये आता कार्यान्वयन यंत्रणांनी आवश्यक निधीची मागणी संचालक, भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचेकडे करावयाची आहे. तदनंतर संचालक, भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय, नागपूर हे कामाच्या प्रगतीचा आढावा घेऊन निधी वितरणाबाबत आदेश निर्गमित करतील असे निर्देश दिलेले आहेत. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ, नागपूर हे सदर आदेशाच्या अनुषंगाने धनादेश काढून संचालक, भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय, नागपूर यांना पुढील वितरणासाठी पाठवतील असेही सदर शासन निर्णयात नमुद आहे.

सदर शासन निर्णयास अनुसरून या संचालनालयाकडे कार्यान्वयन यंत्रणामार्फत निधी मागणी करिता प्रथमच देयके प्राप्त होत आहेत. तथापि सदर देयकांमध्ये व प्रस्तावांमध्ये बरेचदा त्रुटया असलेचे दिसून येते व कामांसाठी निधी उपलब्ध करणेकरिता विलंब होतो. सदर बाबी विचारात घेवून होणारा विलंब टाळणेकरिता खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना देणेत येत आहेत.

निधी वितरणाच्या या सुधारीत कार्यपध्दतीत सर्व संबंधीत यंत्रणांनी आपली मागणी योग्य त्या स्वरूपात व परिपूर्ण कागदपत्रांसह संचालक, भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय यांचेकडे सादर केल्यास निधी वितरणातील संभाव्य विलंब टाळता येईल. त्या अनुषंगाने सर्व कार्यान्वयन यंत्रणांनी आपली मागणी सादर करतांना खालील बाबी विचारात घ्याव्यात.

(१) ज्या कामांना शासनाकडून प्रशासकीय व वित्तीय मान्यता दिलेली आहे अशा कामांपैकी जी कामे संबंधीत कार्यान्वयन यंत्रणा हाती घेणार आहेत, त्या कामांसाठी त्यांनी शासन मान्यतेच्या संदर्भाच्या अनुषंगाने कामाच्या वित्तीय मान्यतेच्या निधीचे १०% रकमेची मागणी संचालक, भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय, नागपूर यांचेकडे सादर करतांना त्यामध्ये खालील बाबींचा स्पष्ट उल्लेख असावा.

| प्रशासकीय आदेश क्र. व दिनांक | कार्यान्वयन यंत्रणेचे नांव | कामांचे नाव | मंजूर निधी | आवश्यक निधी | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

(२) कार्यान्वयन यंत्रणेनी मंजूर काम सुरू केल्यानंतर आवश्यकते नुसार चलदेयके ( Running Bills) वेळोवेळी या संचालनालयाकडे सादर करावीत. प्रगती पथावरील कामांची चलदेयके सादर करतांना खालील बाबींची पुर्तता करावी

(i) देयके स्पष्ट व वाचनीय असावीत. कार्यादेशाच्या प्रतीसह (Work order)

(ii) देयकाची छायांकित (Photo Copy) प्रत असल्यास ती व त्या सोबत सादर केलेल्या कागद पत्रांच्या प्रती साक्षांकित (Attested) असाव्यात.

--२--

४) संचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, नागपूर यांनी कामांच्या प्रगतीचा आढावा घेऊन निधी वितरणाबाबत आवश्यक आदेश निर्गमित करावेत.

५) संचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालयाने निर्गमित केलेल्या निधी वितरण आदेशास अनुसरुन व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ नागपूर यांनी कार्यान्वयन यंत्रणेच्या नांवे धनादेश काढावा.

६) महामंडळाकडून धनादेश काढण्यात आल्यानंतर तो संचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालयामार्फत कार्यान्वयन यंत्रणेस वितरित करण्यात यावा.

७) या निधीतून हाती घेण्यात आलेल्या कामांच्या प्रगतीचे संनियंत्रण करण्याची जबाबदारी भूविज्ञान व खनिकर्म संचालनालयाची राहील.

८) निधीचा वार्षिक हिशोब विद्यमान पध्दती प्रमाणे ठेवण्यात यावा व महामंडळामार्फतच विधीमंडळास सादर करण्यात यावा.

ही सुधारित कार्यपध्दती शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(किशोर कदम)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत.

मा.मुख्यमंत्र्यांचे उपसचिव, मंत्रालय, मुंबई ३२.
मा.राज्यमंत्री (खनिकर्म) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ३२.
अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ, नागपूर.
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ, नागपूर,
संचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, नागपूर.
सर्व जिल्हाधिकारी,
सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई.
वरिष्ठ उपसंचालक, प्रादेशिक कार्यालय, भूविज्ञान व खनिकर्म (नागपूर / चंद्रपूर )
उपसंचालक, प्रादेशिक कार्यालय, भूविज्ञान व खनिकर्म ( कोल्हापूर/ औरंगाबाद )
सर्व जिल्हा खनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
निवडनस्ती

---x---

C:\Nilesh dhaitye\MDF 1010 CR-928.doc

भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय,
महाराष्ट्र शासन, नागपूर
[illegible]

[illegible] / २०१० / [illegible] नागपूर, दिनांक 9 AUG 2016

संदर्भ :- उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र. [illegible] उद्योग-९, दिनांक २२/०४/२०१०

संदर्भांकित शासन निर्णयान्वये शासनाने खनिज विकास निधीतून [illegible] विकास कामासाठी अनुदानाचे वितरण करण्यासंदर्भात उपलब्धतेच्या येत असलेल्या [illegible] केलेला आहे. सदर शासन निर्णयान्वये अशा कार्यान्वयन यंत्रणांनी आवश्यक निधीची मागणी संचालक, भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचेकडे [illegible] संचालक, भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय, नागपूर हे शासनाच्या [illegible] निधी वितरणाबाबत आदेश निर्गमित करतील असे निर्देश दिलेले आहेत. [illegible] संचालक, महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ, नागपूर हे सदर आदेशाच्या अनुषंगाने [illegible] संचालक, भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय, नागपूर यांना पुढील वितरणासाठी [illegible] सदर शासन निर्णयात नमूद आहे.

सदर शासन निर्णयास अनुसरून या संचालनालयाकडे कार्यान्वयन यंत्रणांकडून निधी मागणी करिता प्रस्ताव देयके प्राप्त होत आहेत. तथापि सदर देयकांमध्ये व प्रस्तावांमध्ये [illegible] असल्याने [illegible] व कामांसाठी निधी उपलब्ध करणेकरिता विलंब होतो. सदर बाबी [illegible] होणारा विलंब टाळणेकरिता खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना देण्यात येत आहेत.

निधी वितरणाच्या या सुधारित कार्यपद्धतीत सर्व संबंधित यंत्रणांनी [illegible] स्वरूपात व परिपूर्ण कागदपत्रांसह संचालक, भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय यांचेकडे [illegible] केल्यास निधी वितरणातील संभाव्य विलंब टाळता येईल. त्या अनुषंगाने सर्व कार्यान्वयन [illegible] मागणी [illegible] सादर करतांना खालील बाबी [illegible].

[illegible] ज्या कामांना शासनाकडून प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळाली आहे अशा [illegible] संबंधित कार्यान्वयन यंत्रणा [illegible] आहेत. त्या कामांसाठी [illegible] मान्यतेच्या संदर्भाच्या अनुषंगाने [illegible] वित्तीय मान्यतेच्या निधीचे [illegible] मागणी संचालक, भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय, नागपूर यांचेकडे सादर करतांना [illegible] खालील बाबींचा स्पष्ट उल्लेख करावा.

| प्रशासकीय आदेश क्र. व दिनांक | कार्यान्वयन यंत्रणेचे नाव | कामाचे नाव | मंजूर निधी | आवश्यक निधी | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

[illegible] कार्यान्वयन यंत्रणांनी मंजूर कामे सुरू केल्यानंतर आवश्यकतेनुसार [illegible] Running Bills देयके या संचालनालयाकडे सादर करावीत. प्रथमी [illegible] सादर करतांना खालील बाबींची पूर्तता करावी.

[illegible]

[illegible] Photo Copy [illegible]

[illegible] Attested [illegible]

(iii) देयकांसोबत मंजूर निधी, वितरीत झालेला निधी, आवश्यक निधी [illegible] विवरण सादर करावे. विवरणपत्रातील आवश्यक निधी व [illegible] यामध्ये विसंगती नसो व विसंगती असल्यास त्याचा खुलासा असावा.

(iv) देयकांसोबत पूर्वी वितरीत झालेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र (Fund Utilization Certificate) सादर करावे.

(३) मंजूर कामाचे अंतीम देयक सादर करतांना, उपरोक्त (२) प्रमाणे चालू देयके (Running Bills) सादर करतांना करावयाच्या पुर्ततेसह खालील बाबींचीही पुर्तता करावी.

(i) काम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र (Work Completion Certificate)

(ii) गुणवत्ता प्रमाणपत्र (Test Report)

(iii) पुर्ण झालेल्या कामाची तसेच कामाच्या ठिकाणी लावलेल्या फलकांची रंगीत छायाचित्रे.

(iv) अंतिम देयके संबंधीत जिल्हाधिकारी कार्यालया मार्फत सादर करावीत.

(४) प्रत्येक सादर केलेल्या देयकांवर "खनिज विकास निधी अंतर्गत कामाचे देयक" (Work under Mineral Development Fund) असे स्पष्ट नमूद केलेले असावे.

(५) ज्या कामासाठी निधी वितरीत करण्यात आला आहे त्याच कामावर निधी खर्च करण्याची दक्षता कार्यान्वयन यंत्रणेनी घ्यावी.

(६) ज्या कामांना इतर योजनांमधून निधी प्राप्त / वितरीत झाला आहे अशी कामे खनिज विकास निधी मधून घेण्यात येऊ नयेत याची संपूर्ण जबाबदारी कार्यान्वयन यंत्रणेची राहील.

(७) काम योग्यत्या प्रतीचे व उच्च दर्जाचे करण्याची जबाबदारी संबंधीत कार्यान्वयन यंत्रणेची राहील.

(८) सादर केलेली देयके परिपूर्ण असल्यास या संचालनालय मार्फत [illegible] संबंधीत कार्यान्वयन यंत्रणांना प्राधान्याने देईल.

(९) प्रथम निधीची (१०%) मागणी करतांना त्याची एक प्रत जिल्हाधिकारी कार्यालयाला सादर करण्यात यावी.

(स्वाक्षरी) ९/८/१०
[illegible]

(मा. संचालकांनी मान्य केलेले प्रारूप)

भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय,
महाराष्ट्र शासन, नागपूर

प्रति,

१) मा. प्रधान सचिव (उद्योग), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांना माहितीस्तव सादर
२) जिल्हाधिकारी -------------------- (सर्व)
३) जिल्हा खनिकर्म अधिकारी -------------- (सर्व)
त्यांना कळविण्यात येते की, त्यांनी सदर परिपत्रक जिल्ह्यातील सर्व खनिज विकास निधी अंतर्गत कार्यान्वयीन यंत्रणांचे [illegible] करावे.

(स्वाक्षरी) ९/८/१०
[illegible]
भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय,
महाराष्ट्र शासन, नागपूर

निर्गमित केले
दिनांक 9 AUG 2010

२०.१२.१२

भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय
आवक 303
दिनांक. 2.8.12
सही....

खनिज विकास निधीतून संबंधित जिल्ह्यास सुयोग्य रितीने निधीचे वाटप करण्यासाठी कार्यपध्दती व मार्गदर्शक तत्वे विहीत करण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन

उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग
शासन निर्णय क्रमांक –एमडीएफ-२०१० / प्र.क्र.१०३७ / उद्योग-९
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक - १ ऑगस्ट , २०१२

वाचा- शासन परिपत्रक क्रमांक एमडीएफ-१००२ / प्र.क्र.५५ / उद्योग-९, दि.२६ ऑगस्ट, २००२

प्रस्तावना – महाराष्ट्र खनिज विकास ( निर्मिती व उपयोजन ) निधी अधिनियम, २००१ मधील कलम ७ नुसार खनिज विकास निधीचा वापर व वाटप यासाठी निर्देश देण्याकरीता मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय सल्लागार समिती गठीत करण्यात आलेली आहे.

सदर राज्यस्तरीय सल्लागार समितीच्या यापूर्वी झालेल्या बैठकीतील निर्णयास अनुसरून खनिज विकास निधीच्या वापर व वाटपासंदर्भात दिनांक २६.०८.२००२ च्या परिपत्रकान्वये मार्गदर्शक तत्वे विहीत करण्यात आली आहेत. तथापि, या तत्वानुसार प्रस्तावांना मान्यता देतांना येणा-या अडचणी दुर करून निधीचा पर्याप्त व जनतेच्या अपेक्षा लक्षांत घेऊन तसेच मा. उच्च न्यायालयाने या अनुषंगाने वेळोवेळी दिलेल्या न्याय्य निर्णयाशी सुसंगत अशी निधी वापर व वाटपाची कार्यपध्दती निश्चित करण्यासाठी सदर मार्गदर्शक तत्वांमध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

त्यानुषंगाने दिनांक ०७.०५.२०१२ रोजी मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय सल्लागार समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. व त्यात विविध निर्णय घेण्यात आले आहेत.

शासन निर्णय - राज्य स्तरीय सल्लागार समितीच्या बैठकीतील निर्णय व समितीचे निर्देश विचारात घेऊन निधीचे वाटप आणि मार्गदर्शक तत्वे या संदर्भात पुढील प्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे-

१) खनिज विकास निधीमधील १/३ रक्कम भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय नागपूर व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ, नागपूर यांना त्यांची कार्ये पार पाडण्यासाठी व उर्वरित २/३ रक्कम ही संबंधित जिल्ह्यातून प्राप्त होणा-या खनिज महसूलाच्या प्रमाणात महाराष्ट्र खनिज विकास ( निर्मिती व उपयोजन ) निधी अधिनियम, २००१ मधील कलम ५ ( सी ) नुसार त्या जिल्ह्यामध्ये खनिकर्मामुळे बाधित क्षेत्रात पायाभूत सुविधा, पर्यावरण संतूलन इत्यादीसाठी पुरवण्यात यावी .

२) अ) **परिणामित क्षेत्र** - खाणीच्या बाहय परिघापासून २० कि.मी. त्रिज्येच्या परिसरातील तथापि, जिल्ह्याच्या सीमेपर्यंत मर्यादीत क्षेत्र हे परिणामीत क्षेत्र समजण्यात यावे.

ब) विकास कामांसाठी देय ठरणा-या खनिज विकास निधीपैकी संबंधित ग्रामपंचायतीच्या क्षेत्रातून गत वर्षात प्राप्त झालेल्या महसूलाच्या प्रमाणात प्राप्त होणा-या खनिज विकास निधीपैकी ५०% निधी संबंधित ग्रामपंचायतीना ग्रामसभेच्या मान्यतेने प्रचलित पद्धतीचा अवलंब करुन त्यांच्या क्षेत्रातील बाधित रस्ते, आरोग्य, पर्यावरण, जलसंधारण व भूजल बळकटीकरण या कामांसाठी द्यावा.

क) वरील 'ब' मध्ये नमूद केलेला निधी वगळता उर्वरित निधी खाण क्षेत्राच्या बाहय परिघापासून २० कि.मी त्रिज्येच्या परिसरातील मात्र जिल्हयाच्या सिमेअंतर्गतच फक्त बाधित रस्त्यांसाठीच वापरण्यात यावा.

ड) खनिज विकास निधीतून ग्रामपंचायतींना प्रत्यक्ष अनुदान उपलब्ध न करुन देता वरील ब प्रमाणे कार्यवाही करावी.

इ) पायाभुत सुविधेच्या संदर्भात खनिज विकास निधीतून घेतल्या जाणा-या कामांसाठी टक्केवारीचे बंधन घालण्यात येऊ नये.

ई) खनिज विकास निधीअंतर्गत घ्यावयाची कामे खासदार निधीप्रमाणेच कार्यान्वयन यंत्रणेने इ.टी.पी. चार्जेस न लावता विनाशुल्क तत्वावर राबवावित.

३) **खनिज विकास निधीतून घ्यावयाच्या योजनांचे वर्गीकरणानुसार निश्चिती**

अ) **पायाभूत सुविधांचा विकास** - राष्ट्रीय महामार्गां प्रमाणे प्रमुख राज्य मार्ग व राज्य मार्गांची तसेच रुपये २ कोटीपेक्षा अधिक किंमतीची रस्ते विकासाची कामे वगळून इतर कामे घेण्यात यावी. त्यामध्ये पुलाच्या कामाचा समावेश करण्यात येऊ नये. तथापि, रस्त्यांची क्षमता ३५ ते ४० टनांची असावी.

खनिज विकास निधीतून वीज व इतर दुरसंचार सुविधांची कामे घेण्यात येऊ नयेत.

ब) **पिण्याचे पाणी पुरवठा विकास व पुरवणीकरण** - पिण्याचे पाणी पुरवठा विकास योजना व पुरवणीकरणाची कामे घेण्यात येऊ नये. तथापि, जलसंवर्धन आणि भूजल बळकटीकरणाची रुपये २ कोटी पर्यंत किंमतीचीच कामे घेण्यात यावीत.

खनिज विकास निधीतून पुनर्वसन व विकासाची कामे घेण्यात येऊ नयेत.

क) **पर्यावरण संतुलन कायम राखणे** - संबंधित जिल्ह्याच्या विकास कामांसाठी देय अनुदानाच्या किमान २०% निधी पुढील कामांसाठी देण्यात यावा. पर्यावरण संतुलनाची कामे घेण्यासाठी कमाल मर्यादा नाही.

१) वनीकरण

२) पाण्याची पातळी कायम राखण्याची दक्षता

३) व्यावसायिक आरोग्य सेवेला पुरवणीकरण

४) पर्यावरणाचा समतोल व प्रदुषण नियंत्रणाचे उपायांमध्ये विद्यमान कामांशिवाय वाळू गटाच्या लिलावापूर्वी करावयाचा पर्यावरण विषयक अभ्यास व पर्यावरण आघात मुल्यांकन EIA व EMP तयार करण्याचा खर्च अनुज्ञेय राहील व तो संबंधित जिल्ह्यास देय खनिज विकास निधीतून पर्यावरणासाठी उपलब्ध होणाऱ्या अनुदानातून भागविण्यात यावा.

ड) **खनिज संवर्धन व विकास** - खनिज संस्करण व टाकाऊ खनिज पुन्हा वापरण्याकरीता संशोधन व विकास

४) यापूर्वीच्या निदेशानुसार भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय व महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळास देण्यात येणारी १/३ रक्कम त्यांची कार्ये पार पाडण्यासाठी दिली जाईल. संचालनालयास दिल्या जाणा-या निधीचा विनियोग पुढील बाबींसाठी देखील करता येईल.

१) खनिकर्म अधिका-यांकरीता नवीन वाहन खरेदी, त्यांचे परिरक्षण दुरुस्ती व अनुषंगिक बाबी.

२) महाराष्ट्र सुदूर संवेदन केंद्राच्या सहाय्याने खाण क्षेत्राचे डिजिटल मॅप तयार करणे व उपग्रहाद्वारे उत्खनित क्षेत्राचा वार्षिक आढावा आणि अनुषंगिक बाबी.

३) संचालनालयाचे संगणकीकरण.

४) अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, ऑनलाईन रॉयल्टी पेमेंट, खनिज व्यावसायिकांची नोंदणी, डाटा बँक तयार करणे इत्यादी विविध संगणक प्रणाली तयार करणे.

५) खनिज सवलतींसंदर्भात न्यायालयीन प्रकरणी अधिवक्ता व वरिष्ठ विधी व्यवसाय यांना व्यावसायिक प्रदाने, फी इ.

६) गौण खनिज अवैध उत्खनन रोखण्यासाठी महसूल विभागामार्फत मंत्रालय स्तरावर गठीत करण्यात आलेल्या दक्षता समितीसाठी एक वाहन उपलब्ध करुन देणे.

५) <u>कार्यान्वयन यंत्रणांना निधीचे वाटप</u> - कार्यान्वयन यंत्रणांना निधीचे वाटप करण्यासंदर्भातील शासन निर्णय क्रमांक-एमडीएफ-२०१०/ प्र.क्र. ९५५/ उद्योग-९, दिनांक २२.०४.२०१०अधिक्रमीत करुन पूर्वीप्रमाणेच व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ यांचेकडून केवळ इलेक्ट्रॉनिक्स क्लिअरन्स सिस्टम (ECS) पध्दतीने कार्यान्वयन यंत्रणांना निधीचे वाटप करण्यात यावे.

वरील मार्गदर्शक तत्वे व निकषाप्रमाणे पात्र ठरणारे प्रस्ताव संबंधित जिल्हाधिकारी यांनी महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळामार्फत प्रशासकीय मान्यतेसाठी शासनाकडे सादर करावेत. दिनांक २६.०८.२००२ चे परिपत्रक या निर्णयाव्दारे अधिक्रमीत करण्यात आले आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संगणक संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक 201208011527051101 असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

1 AUG 2012

(किशोर कदम)
शासनाचे उप सचिव

प्रति,

मा.मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई – ३२

मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई - ३२

मा. राज्यमंत्री (खनिकर्म) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई – ३२

अपर मुख्य सचिव (महसूल) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई -३२

प्रधान सचिव (उद्योग) उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई – ३२

सचिव (पर्यावरण) विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२

व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ, नागपूर

संचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, नागपूर

सर्व जिल्हाधिकारी

निवड नस्ती. (उद्योग -९)